झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा-१/झोपुआ/१२४/२०२५
दिनांक : २५/०४ /२०२५

वाचले :-

१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुनल व पुनर्विकास अधिनिय,१९७१ मधील कलम ३(क) अन्वये दि.२३/०७/२०२४ रोजीची झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबतचे पुर्वसूचना "जाहीर नोटीस".

---

**"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)"**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

सि.स.नं.६३३,महात्मा फुले पेठ, गंज पेठ, पुणे येथील अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहे.

१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपुप्रा,पुणे हे सक्षम आहेत; आणि

२) ज्याअर्थी, अनुसूचीत निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२४/०७/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन सदरची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र ऑगस्ट ०८ ते ऑगस्ट १४, २०२४ पृष्ठ क्र.२६ व २७ वर तसेव दैनिक दायित्व वृत्तपत्रात व दैनिक जन मंथन दि.०१/०८/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२५/०७/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक यांना व एक प्रत माहितीस्तव मा.आयुक्त,पुणे महानगरपालिका,पुणे यांना देण्यात आली आहे. पूर्वसूचनेव्दारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३०दिवसांच्या आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्मविण्यात आले होते.

४) ज्याअर्थी, विषयांकित जागेचे संपादन होऊन वि.भू.संपादन अधिकारी यांनी सदर जागेचे संपादन करुन सहकारी गृहनिर्माण संस्थेला ताबा दिला आहे, मात्र त्याबाबत विकसकाने दि.१९/०३/२०२५ रोजी शासनाकडे पुनर्विलोकन अर्ज सादर केला असून झोपुप्राकडे दि.२७/०२/२०२५ रोजीच्या हमीपत्राने २५ % आधिमूल्य भरण्याची तयारी दर्शवली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मधील तरतुदीनुसार अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्यासंदर्भातील दि.२३/०७/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाव्दारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपिल दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : सि.स.नं.६३३,महात्मा फुले पेठ, गंज पेठ, पुणे
महानगर पालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

| पेठ | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| महात्मा फुले पेठ, गंज पेठ, पुणे | सि.स.नं.६३३,महात्मा फुले , | सरकारी (महाराष्ट्र शासन) | ६८८१.५९ चौ.मी. | पुर्वेस - लागू फा.प्लॉट नं. २२९<br>दक्षिणेस - लागू फा.प्लॉट नं.२१७<br>पश्चिमेस - जागेवरील लागू रस्ता व फा. प्लॉट नं.२१९<br>उत्तरेस - लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २५/०४/२०२५

सत्यप्रत

नायब तहसिलदार
झो.पु.प्रा.,पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे

(नीलेश गटणे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत –

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. तहसिलदार, पुणे शहर
४. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती
५. सावधान मागासवीय सहकारी गृहरचना संस्था मर्या., यांना माहितीस्तव .
६. विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांना माहितीस्तव